# भा.कृ.अनु.प.—केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०१६ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

‘‘हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे’’

### हवामानासंबंधी सल्ला

| दिनांक | सप्टेंबर | | | | | | | | | | | ऑक्टोबर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रत्यक्ष झालेला पाऊस | | | | | | | भारतीय हवामानखात्याने वर्तविलेला पावसाचा अंदाज | | | | | | सल्ला |
| दिनांक | १५ ते २१ | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | १ | २ | |
| महाराष्ट्र | | | | | | | | | | | | | | सप्टेंबर महिन्याच्या शेवटच्या पंधरवाडयात महाराष्ट्रात चांगला पाऊस झाला आहे. जमिनीत मुबलक प्रमाणात ओलावा असल्यामुळे पिकाला खतांचा वाढीव डोस जसे कि युरिया २० किलो, म्युरेट ऑफ पोटॅश १०—१५ किलो/ऐकर आणि फवारणीद्वारे देण्यास येणारी खते जसे कि युरिया २% (२० ग्रॅम प्रति १ लिटर पाणी) किंवा १—२% (१०—२० ग्रॅम/लिटर पाणी) $KNO_3$ सोबतच १% (१० ग्रॅम/लिटर पाणी) मॅग्नेशियम सल्फेट २—३ वेळा प्रत्येकी ५—७ दिवसाच्या फरकांनी करण्याची ही अगदी योग्य वेळ आहे. शेतातील जास्त असलेले पाणी काढून घ्यावे ज्यामुळे पिकांचे मर रोगापासून आणि पात्याच्या होणाऱ्या गळतीपासून पिकांचे संरक्षण होते. प्लॅनोफिक्स ची फवारणी प्रत्येक पंधरा दिवसांनी करावी. राहूरी जिल्हयातील पाहणी केलेल्या ३ गावापैकी (गोटूंबे आखाडा आणि सडे) या गावातील १—३ ठिकाणी तुडतुडयाचे प्रमाण नुकसानीच्या पातळीवर आढळून आले |
| धुळे | ७३.७ | ० | ०.६ | ३.८ | ९.४ | ०.८ | ० | १७.४ | २ | ३ | ० | ४ | २ | |
| नंदुरबार | १०२.९ | ० | १५ | ६.२ | ०.५ | ९.५ | ३.३ | १.३ | ० | ० | ० | ० | ० | |
| जळगांव | १०७.९ | १६.२ | १५ | ०.५ | ७.२ | ६.५ | ५.५ | १.८ | ४ | ३ | ० | ३ | २ | |
| अहमदनगर | १२९.१ | ५ | १८.३ | २३.२ | २२.३ | १०.१ | १.१ | ३.५ | ३ | ४ | ३ | ४ | १२ | |
| औरंगाबाद | ७८.२ | ४.७ | ४.४ | १ | २५.६ | ९.१ | १.५ | ०.२ | २ | २ | ० | ४ | ४ | |
| जालना | ७४.८ | १.५ | २.२ | ३.८ | ५१.८ | ३६.३ | २.३ | ० | ० | ४ | २ | ० | १ | |
| बीड | १२२ | ५.६ | २४.१ | ५९ | ९१.७ | ४१.२ | ३.१ | ०.७ | ० | ७ | ३ | १ | ५ | |
| नांदेड | १०१.३ | १७.३ | १६.४ | १८.५ | ४५.३ | १२.३ | १०.९ | ५.१ | ५ | ७ | १० | २ | ५ | |
| परभणी | १४३.६ | १७.१ | ४१.४ | २५.५ | ७२ | १९.९ | ९.५ | ०.१ | ० | ७ | ३ | २ | ३ | |
| हिंगोली | ९२ | १३ | ०.५ | २०.८ | ४८.५ | ६ | ६.३ | ३.५ | १० | १४ | १० | ५ | ७ | |
| बुलढाणा | ४७.४ | १.७ | ४.७ | ०.२ | २९.३ | १८.७ | १.९ | ० | ४ | ४ | १ | १ | २ | |
| अकोला | ५८.७ | ० | १.४ | ४ | १२.४ | १०.७ | १.९ | ३.४ | ५ | ६ | २ | १ | ६ | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वाशिम | ४५.४ | ३.५ | ० | १७.८ | ३०.९ | ४.५ | ३ | १३.३ | ५ | ५ | १ | १ | ४ |
| अमरावती | ६९.५ | ७.७ | ३.३ | ११.९ | १६.६ | १०.५ | १४.८ | २.२ | ५ | ८ | १ | १ | १० |
| यवतमाळ | ५१.४ | १७.७ | ०.४ | ४.१ | ५.६ | १२.७ | १३ | ८.९ | २५ | ९ | ४ | ४ | ५ |
| वर्धा | ४१ | २.४ | ० | ० | ०.२ | ४.५ | १४.६ | ८.३ | २० | १२ | ५ | ५ | ७ |
| नागपूर | ११.८ | २.९ | ०.३ | १.२ | १.९ | ९.७ | २०.३ | ७.१ | २५ | १५ | ७ | ९ | ७ |
| चंद्रपूर | ४५.५ | २६.६ | ५.२ | ०.६ | ३.८ | ५८.३ | २५.८ | १०.६ | २५ | १२ | ९ | ७ | ७ |

आहे. नांदेड जिल्हयातील पाच गावापैकी (पिंपळगाव, फुलवाल, केरोडा, तरताळा आणि तुप्पा) या गावात पांढऱ्या माशीचे प्रमाण सर्व ठिकाणी नुकसानीच्या पातळीवर आढळून आले तर तुडतुडयांचे, फुलकिडयांचे आणि गुलाबी बोंडअळीचे प्रमाण ३—५ ठिकाणी नुकसानीच्या पातळीवर आढळून आले आहे. अकोला जिल्हयातील तीन गावापैकी (निमकरडा, उग्वा आणि आगर) या गावापैकी फुलकिडयांचे प्रमाण २—३ ठिकाणी आणि तुडतुडयांचे प्रमाण ३—४ ठिकाणी नुकसानीच्या पातळीवर आढळून आले आहे.

| **आख्यायिक** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मि.मी. मध्ये) | <५ | ५-२० | २०-५० | ५०-८० | >८० |
| | | | | | |

संदर्भ:— http://nwp.imd.gov.in/bias/dist_fcst.htm